|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. १६ सप्टेंबर २०२६: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत आज दिनांक १६ सप्टेंबर रोजी 'जागतिक ओझोन दिन' साजरा करण्यात आला.

यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. एस.बी. अत्तरदे यांनी मानवाच्या निसर्गावरील आक्रमणामुळे पृथ्वीच्या अस्तित्वाला निर्माण झालेला धोका आणि ओझोन थराच्या विनाशाची गंभीर स्थिती या पार्श्वभूमीवर त्यांनी योग मार्गदर्शन केले. वाढते प्रदूषण आणि बदलत्या हवामानामुळे मानवी संस्कृतीच्या विनाशाकडे होणारी वाटचाल थांबवणे व पृथ्वीचे रक्षण करणे असे सांगितले. ओझोनचा थर नष्ट झाल्यास पृथ्वीवरील जीवसृष्टीचा अंत कसा निश्चीत आहे याची अत्यंत भीषण व सद्यकालीन वास्तव मांडणारी आकडेवारी त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. जागतिक तापमानवाढीच्या विरोधात तात्काळ पावले न उचलल्यास येणाऱ्या पिढयांना याचे अत्यंत गंभीर परिणाम भोगावे लागतील असा गंभीर इशारा दिला.

तसेच प्रा. व्ही.एम. रोकडे यांनीही मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाप्रती संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी एक भित्तीचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी 'ग्लोबल ॲक्शन फॉर अ प्लनेट' ही मुख्य संकल्पना निश्चीत करण्यात आली होती. जागतिक तापमानवाढीला आणि ओझोन थराला हानी पोहोचवणाऱ्या घटकांना रोखण्यासाठी जागतिक पातळीवर होत असलेल्या प्रयत्नांचे महत्व या भित्तीचित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अधोरेखित केल.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी महाजन आणि समन्वयक प्रा. राजेंद तायडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील सर्व संशोधक, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. १६ सप्टेंबर, २०२६

प्रती,<br>
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता